जनसामान्यांच्या मनातील आरसा
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | सोमवार
३०.०७.२०२६
# वरुड दर्पण
संपादक - चंद्रकांत भा. भड
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: २५ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
अमरावती-नागपूर-चंद्रपूर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
+91 7745067712

**समृद्धी महामार्गावर भीषण अपघात**

## टेम्पोच्या धडकेने कार पेटली, ५ जणांचा मृत्यू



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वर्धा** – समृद्धी महामार्गावर वर्ध्याजवळील विरुळ भागात एक अत्यंत भीषण आणि दुर्दैवी अपघात घडला आहे. आयशर ट्रक आणि स्विफ्ट डिझायर कार यांच्यात झालेल्या जोरदार धडकेनंतर कारने पेट घेतला. या दुर्घटनेत कारमधील चालकासह एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच होरपळून मृत्यू झाला, तर धडक देणाऱ्या आयशर ट्रकच्या चालकाचाही यात मृत्यू झाला आहे.

या अपघातात एकूण ५ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे मुलीच्या ॲडमिशनचा आनंद क्षणार्धात मावळला मिळालेल्या माहितीनुसार, मृत पावलेले कारमधील चौघेही वर्धा जिल्ह्यातील सालोड हिरापूर येथील रहिवासी होते. कुटुंबातील जुळ्या मुलींपैकी एका मुलीच्या इंजिनिअरिंग प्रवेशासाठी हे कुटुंब पुण्याला गेले होते. प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ॲडमिशन घेतलेली मुलगी पुण्यातच थांबली, तर आई-वडील, दुसरी मुलगी आणि चालक कारने वर्ध्याकडे परत येत होते. मात्र, वाटेतच काळाने त्यांच्यावर घाला घातला. जुळ्या बहिणींपैकी एका बहिणीचा या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे सालोड गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे अपघाताच्या काही वेळापूर्वी घटनास्थळाजवळ एथेनॉलचा एक टँकर उलटला होता. सुरक्षेचा उपाय म्हणून पोलिसांनी महामार्गाची एक बाजू बंद करून एकेरी वाहतूक सुरू केली होती. एकेरी वाहतूक सुरू असताना मागून येणाऱ्या भरधाव मालवाहू आयशर ट्रक चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि तो थेट पुढे असलेल्या कारवर जाऊन आदळला. धडक इतकी भीषण होती की अपघातानंतर कारने क्षणात पेट घेतला. कारमधील प्रवाशांना बाहेर पडण्याची साधी संधीही मिळाली नाही आणि आतच होरपळून चौघांचा करुण अंत झाला. घटनेची माहिती मिळताच पुलगाव पोलीस आणि स्थानिक प्रशासनाने घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य राबवले. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## जंतरमंतरवरील आंदोलकांवर पोलिसांचा लाठीचार्ज

### दिल्लीत कडेकोट बंदोबस्त

**सीजेपी आंदोलकांचा तो गट संसदेपर्यंत धडकताच एकच धावाधाव, सुरक्षारक्षकांनी बंदुका रोखल्या, सगळे गेटकडे धावले**



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – कॉकरोच जनता पक्षाच्या 'चलो संसद' मोर्चादरम्यान जंतरमंतरवरून संसदेकडे जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंदोलकांना रोखण्यासाठी दिल्ली पोलिसांनी लाठीचार्ज केला.

मोर्चाला परवानगी नसल्याचे स्पष्ट करत पोलिसांनी आंदोलकांना पुढे जाण्यापासून रोखले. या पार्श्वभूमीवर जंतरमंतर, संसद परिसर आणि मध्य दिल्लीतील संवेदनशील भागात कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून, संपूर्ण परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

**पावसातही जंतरमंतरवर हजारोंची गर्दी**

नीट-यूजी २०२६ परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि अनियमिततेविरोधात उगझने दिलेल्या 'चलो संसद'च्या हाकेला प्रतिसाद देत हजारो समर्थक सोमवारी सकाळी जंतरमंतर येथे एकत्र आले. मुसळधार पाऊस आणि कडेकोट सुरक्षा व्यवस्थेनंतरही आंदोलनकर्त्यांनी ठिय्या कायम ठेवला.

**जंतरमंतरला चारही बाजूंनी घेराव**

मोर्चापूर्वीच दिल्ली पोलिसांनी संसद भवनाकडे जाणारे अनेक रस्ते बंद केले. जंतरमंतर परिसराला चारही बाजूंनी बॅरिकेड्स लावून घेराव घालण्यात आला. संसद परिसरात कोणताही विनापरवानगी मोर्चा जाऊ दिला जाणार नाही, असा इशाराही पोलिसांनी दिला होता.

**कलम १६३ लागू; मेट्रो स्थानकेही बंद**

सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आले.

तसेच जनपथ, पटेल चौक, राजीव चौक, सेंट्रल सेक्रेटरिएट आणि सेवा तीर्थ या मेट्रो स्थानकांवरील प्रवेश तात्पुरता बंद ठेवण्यात आला.

**मोर्चा रोखताना लाठीचार्ज**

आंदोलकांनी संसदेकडे पुढे जाण्याचा प्रयत्न केल्यानंतर दिल्ली पोलिसांनी त्यांना अडवण्यासाठी लाठीचार्ज केला. काही ठिकाणी आंदोलक आणि पोलिसांमध्ये धक्काबुक्कीही झाली. त्यानंतर अतिरिक्त पोलीस फौज आणि रॅपिड ॲक्शन फोर्स तैनात करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली.

**थोडक्यात**

### मानखुर्दमध्ये बेस्ट बसचा भीषण अपघात, एका वृद्धाचा मृत्यू, अनेक जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – मुंबईतील मानखुर्द परिसरात सोमवारी सकाळी बेस्ट बसचा अपघात झाला. सायन-पनवेल महामार्गावरील विश्वकर्मा रुग्णालयासमोर मार्ग क्रमांक ५०१ ची बेस्ट बस रस्त्यावरील दुभाजकावर धडकली.

या अपघातात दुभाजकाजवळ उभ्या असलेल्या एका ६५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला असून चालक, वाहक आणि प्रवाशांसह एकूण ८ जण जखमी झाले आहेत. ही घटना सकाळी सुमारे ९.१४ वाजण्याच्या सुमारास घडली. अपघातानंतर पोलिस, अग्निशमन दल आणि रुग्णवाहिका तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या.

## संजय राऊत देशातील तरुणांना भडकवण्याचा प्रयत्न करत आहेत : त्यांचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत - नवनाथ बन



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत आणि आदित्य ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली आहे. देशातील तरुण वर्ग पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत असून, तरुणांना भडकवून देशात अस्थिरता निर्माण करण्याचा कोणताही प्रयत्न यशस्वी होणार नाही, असा दावा त्यांनी केला.

मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना बन म्हणाले की, दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी न्यायालयाच्या निर्देशांनुसार कारवाई केली आहे. स्टार्टअप, मेक इन इंडिया आणि इतर उपक्रमांमध्ये देशातील तरुण मोठ्या संख्येने सहभागी होत असल्याने त्यांचा सरकारवरील विश्वास कायम असल्याचे त्यांनी सांगितले.

आदित्य ठाकरे यांच्या आंदोलनावर टीका करताना त्यांनी भगव्या विचारांपासून दूर जाण्याचा आरोप केला. हिंदुत्वाच्या भूमिकेवर ठाम राहूनच नेतृत्व करता येते, असेही त्यांनी म्हटले. तसेच उद्धव ठाकरे यांनी रामाच्या नावाने आंदोलन करण्याऐवजी आपल्या पक्षाच्या भवितव्याचा विचार करावा, असा टोला त्यांनी लगावला.

संजय राऊत यांच्यावर टीका करताना नवनाथ बन यांनी ईडी आणि इतर तपास यंत्रणांबाबत केलेल्या वक्तव्यांचा उल्लेख केला. भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे तपास यंत्रणा कारवाई करत असल्याचे सांगत त्यांनी ईडीवर टीका करणे योग्य नसल्याचे मत व्यक्त केले.

पत्राचाळ प्रकरणाचाही त्यांनी उल्लेख केला. याशिवाय, निवडणूक आयोग आणि केंद्रीय संस्थांबाबत विरोधकांची भूमिका परिस्थितीनुसार बदलत असल्याचा आरोपही त्यांनी केला. निकाल अनुकूल आला तर संस्थांचे कौतुक आणि प्रतिकूल आला तर त्यांच्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते, अशी टीका त्यांनी केली. दरम्यान, भाजपच्या या टीकेला ठाकरे गटाकडून काय प्रत्युत्तर दिले जाते, याकडे आता राजकीय वतुर्ळाचे लक्ष लागले आहे.

## अवघ्या एका वर्षापुर्वीच्या कचरा देयकामध्ये १० लाखांचे अंतर

**संबंधितांना देयक अदा करतांना साशंकता : चौकशी करण्याची मागणी**








(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – एकीकडे घनकचरा व्यवस्थापनाचे तीन तेरा वाजले असताना अवघ्या एका वर्षात घनकचरा व्यवस्थापनाचा खर्च तब्बल दहा लाखांनी वाढल्याने आश्चर्य व्यक्त केला जात असून हे १० लाख वाढले तरी कसे? असा प्रश्न या निमित्ताने उभा ठाकला आहे.

शहरात स्वच्छतेचा बोजवारा वाजला असताना एकेकाळी वरुड नगर परिषदेला स्वच्छतेच्या संदर्भात विविध पुरस्कार प्राप्त झाले परंतु गेल्या दिवाळीपासून म्हणजे नवीन पदाधिकारी नगरपरिषद प्रशासनामध्ये कामकाज बघायला लागले तेव्हापासून घनकचरा व्यवस्थापनाच्या मासिक देयकामध्ये प्रचंड वाढ झाल्यामुळे आणि शहरातील कचरा जैसे ते असल्यामुळे हा पैसा जातो तरी कुठे? की संबंधित कॉन्ट्रॅक्टदाराच्या नावाने देयक काढून इतरांच्या खिशात तर तो घातला जात नाही ना? असा प्रश्न सुद्धा या निमित्ताने सर्वसामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

शहरातील घनकचरा व्यवस्थापनाची व्यवस्था पूर्णपणे ढासळल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे. शहरातील अनेक भागांमध्ये कचऱ्याचे ढीग दिवसेंदिवस पडून राहत असल्याने दुर्गंधी, अस्वच्छता आणि डास-माशांचा प्रादुर्भाव वाढला आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला असुन नगर परिषदेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरात कचरा संकलनासाठी यंत्रणा उभारण्यात आली असली तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी वेळेवर कचरा उचलला जात नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. काही भागात कचऱ्याच्या गाड्या नियमित फिरत नसल्याने नागरिकांना उघड्यावर कचरा टाकण्याची वेळ येत आहे. परिणामी रस्त्यांलगत आणि सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचत असून शहराचे विद्रूप चित्र पाहायला मिळत आहे.

संपूर्ण शहरातील कचरा संकलित करून तो कचरा टेंभुरखेडा रस्त्यावरील घनकचरा व्यवस्थापन परिसरामध्ये नेला जातो आणि त्या ठिकाणी कचऱ्याची मोजणी करुन संबंधित कंत्राटदाराला प्रति टन प्रमाणे त्याला देयक दिल्या जाते. वरुड शहरात नगरपरिषदेच्या मालकीचे ३ ट्रॅक्टर, ७ छोटे ऑटो आणि इतर २ वाहने अशी शहरातून कचरा संकलत करणाऱ्या वाहनांची संख्या आहे. छोट्या ऑटो मध्ये एक क्विंटल पेक्षाही कमी कचरा वाहून येण्याची क्षमता आहे तर ट्रॅक्टर मध्ये किमान दोन ते अडीच क्विंटल कचरा वाहुन नेला जातो, अशा स्थितीत एवढ्या मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे संकलन केल्या जाते की नाही? याबाबत साशंकता आहे. विशेष म्हणजे एप्रिल २०२५ मध्ये १३ लाख ९० हजार ८५८ रुपयांचे घनकचरा व्यवस्थानाचे देयक काढण्यात आले होते त्यामध्ये सतत वाढ झाली आणि एप्रिल २०२६ मध्ये तब्बल २४ लाख २४ हजार ४७ रुपयांचे देयक काढण्यात आले. त्यामुळे घनकचरा व्यवस्थापनाच्या देयकामध्ये मोठी तफावत दिसुन येत असल्याने या संपुर्ण प्रकाराची चौकशी होणे गरजेचे आहे.

दुसरीकडे नगरपरिषदेने ज्या सार्वजनिक ठिकाणी नागरिक कचरा टाकतात, त्या त्या ठिकाणी या ठिकाणी कचरा टाकू नये, अन्यथा दंडात्मक कार्यवाही केली जाईल, अशा सुचना असणारे फलक लावले परंतु एकीकडे कचरा गोळा करणारी वाहने नियमित येत नाही आणि दुसरीकडे कचरा सुध्दा सार्वजनिक ठिकाणी टाकू नये अशा सुचना देवुन कचरा टाकावा, तरी कुठे? प्रश्न आता शहरवासियांकडून विचारला जात आहे. स्वच्छ भारत अभियान आणि घनकचरा व्यवस्थापनासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत असताना त्याचा अपेक्षित परिणाम शहरात दिसत नसल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. केवळ कागदोपत्री स्वच्छतेचा दावा करुन चालणार नाही तर प्रत्यक्षात प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाने तातडीने कचरा संकलन नियमित करावे, साचलेला कचरा हटवावा, तसेच घनकचरा व्यवस्थापनाची प्रभावी अंमलबजावणी करून शहराला स्वच्छ व निरोगी ठेवण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

**२०२३ मध्ये काढण्यात आलेले देयक**

| | |
|---|---|
| एप्रिल | १५२१८७२ |
| मे | १६२५५३२ |
| जुन | ९४६७४३ |
| जुलै | १२५७३९१ |
| ऑगस्ट | १४९९८६३ |
| सप्टेंबर | १५०९३५९ |
| ऑक्टोंबर | १४७८४३३ |
| नोव्हेंबर | १६४२८३८ |
| डिसेंबर | १५९४१०८ |
| जानेवारी | १४८४२०७ |
| फेब्रुवारी | १५४७००८ |
| मार्च | १३४२७३८ |

**२०२५ मध्ये काढण्यात आलेले देयक**

| | |
|---|---|
| एप्रिल | १३९०८५८ |
| मे | २१२८७०५ |
| जुन | १९६४२३७ |
| जुलै | २०३३९५६ |
| ऑगस्ट | १९२०२०४ |
| सप्टेंबर | २१४७७०५ |
| ऑक्टोंबर | २१६६०५४ |
| नोव्हेंबर | २०१९२७६ |
| डिसेंबर | १९९१७५७ |
| जानेवारी | १९३६००० |
| फेब्रुवारी | २३१५७९९ |
| मार्च | २५३२३११ |

**२०२६ मध्ये काढण्यात आलेले देयक**

| | |
|---|---|
| जानेवारी | १९३६००० |
| फेब्रुवारी | २३१५७९९ |
| माच | २५३२३११ |
| एप्रिल | २४२४०४७ |

# ‘आपला कुंभ, आपली जबाबदारी’ पुस्तिकेचे प्रकाशन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**नाशिक** – सिंहस्थ कुंभमेळ्याला शेकडो वर्षांची परंपरा आहे. ही परंपरा नाशिककरांसह सर्वांपर्यंत पोहोचावी यासाठी सिंहस्थ सहायक समितीने प्रकाशित केलेली ’आपला कुंभ, आपली जबाबदारी’ ही पुस्तिका उपयुक्त ठरेल, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा, आपत्ती व्यवस्थापन, तथा कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी केले. नाशिक–त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाची बैठक रविवारी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या बैठकीपूर्वी छोटेखानी समारंभात ’सिंहस्थ कुंभ पर्व: सोहळा जनजागरणाचा, भावजागरणाचा जनसहभागाचा’ या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. महापौर हिमगौरी आडके–आहेर, प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, पोलीस आयुक्त डॉ.संदीप कर्णिक, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, महापालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक डॉ.डी. एस. स्वामी, स्थायी समिती सभापती मच्छिंद्र सानप, सिंहस्थ सहायक समितीचे गिरीश सातपुते आदींची यावेळी उपस्थिती होती.

# सरकार पोरांना घाबरलेय, ५६ इंचवाल्यांची हातभर : संजय राऊतांचा भाजपवर हल्लाबोल

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – नीट परीक्षेतील कथित गैरव्यवहारांच्या मुद्द्यावरून दिल्लीच्या जंतरमंतरवर गेल्या काही दिवसांपासून आंदोलन सुरु आहे.

आंदोलकांनी संसदेवर महामोर्चा काढण्याची घोषणा केल्यानंतर दिल्लीत प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून अनेक मेट्रो स्टेशन्स बंद करण्यात आली आहेत. या संपूर्ण घडामोडींवर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकार आणि



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला आहे. खासदार संजय राऊत यांनी आपल्या ’एक्स’ अकाउंटवरून ट्विट करत केंद्र सरकारवर जोरदार प्रहार केला. त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, ‘सरकार पोरांना घाबरलेय! शुद्ध मराठीत सांगायचे तर ५६ इंच वाल्यांची हातभर फाटली. डरो मत! संसदेवरील मार्चला परवानगी नाकारली; शक्य असते तर जंतर मंतरवरील लाखो लोकांना एऊ लावली असती. पण ते कठीण आहे. मोर्चाचा मार्ग एऊ च्या दिशेने वळवायला हवा. एव, सुप्रीम कोर्ट या सारख्या संस्था मोदी, शाहांच्या गुलाम झाल्या आहेत,‘ अशी टीका त्यांनी केलीय.

# रेल्वे प्रवासादरम्यान कोसळुन युवकाचा मृत्यू

**मुर्तिजापुर रेल्वे स्टेशन नजीकची घटना**

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरूड** – शेगाव येथे दर्शनासाठी जाणाऱ्या वरुड तालुक्याच्या फत्तेपुर येथील एका तरुण प्रवाशाचा रेल्वेतून पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रयाग चव्हाण असे मृत युवकाचे नाव असून, मूर्तिजापूरजवळ घडलेल्या या भीषण अपघातामुळे संपूर्ण तालुक्यात एकच खळबळ माजली आहे. हा केवळ अपघात आहे की घातपात? याचा शोध आता रेल्वे पोलिसांनी सुरू केला आहे.



प्राप्त माहितीनुसार, फत्तेपूर येथील प्रयाग चव्हाण हा त्याच्या एका मित्रासह बुधवार १५ जुलै रोजी शेगावला जाण्यासाठी निघाला होता. त्यांनी वरुड रेल्वे स्थानकावरून प्रवास सुरू केला आणि ते प्रथम अमरावती येथे पोहोचले. अमरावतीवरून त्यांनी शेगावसाठी जाणाऱ्या ट्रेनमध्ये प्रवास सुरू केला. हा प्रवास सुरू असतानाच, मूर्तिजापूर रेल्वे स्थानकाजवळ अचानक प्रयाग हा धावत्या ट्रेनमधून खाली कोसळला. हा अपघात इतका भीषण होता की, ट्रेनखाली आल्यामुळे प्रयागचे दोन्ही पाय गंभीररीत्या छिन्नविच्छिन्न झाले. अपघातानंतर रक्तबंबाळ अवस्थेत असलेल्या प्रयागला तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

डॉक्टरांनी त्याचे प्राण वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, मात्र शरीरातून प्रचंड रक्तस्त्राव झाल्यामुळे आणि गंभीर दुखापतीमुळे अखेर गुरुवार १६ जुलै रोजी उपचारादरम्यान त्याची प्राणज्योत मालवली. प्रयाग ट्रेनमधून नेमका कसा पडला? याबाबत अद्याप गूढ कायम आहे. अपघाताच्या वेळी प्रयाग सोबत प्रवास करणाऱ्या त्याच्या मित्राशी संपर्क साधण्याचा प्रयत्न रेल्वे पोलीस करत आहेत. त्याचा जबाब नोंदविल्यानंतरच या घटनेमागील नेमके कारण स्पष्ट होऊ शकणार आहे. रेल्वे पोलिसांनी याप्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास वेगाने सुरु आहे. या घटनेची माहिती वरुड तालुक्यात समजताच फत्तेपूर परिसरात शोककळा पसरली. घटनेचे गांभीर्य ओळखुन वरुड येथील सामाजिक कार्यकर्ते पवन देशमुख, राहुल पाटील आणि सुनील चव्हाण यांनी तातडीने मुर्तिजापूरच्या दिशेने धाव घेतली असून, ते मृतकाच्या कुटूंबियांना कायदेशीर व वैद्यकीय प्रक्रियेत मदत करत आहेत. एका तरुण आणि उमद्या युवकाचा अशा रीतीने रेल्वे अपघातात अंत झाल्याने फत्तेपूर गावासह संपूर्ण वरुड तालुक्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## कल्याणमध्ये महिलेने प्रियकराला ’दृश्यम’ स्टाईल संपवलं

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – कल्याणच्या मलंग रोडवरील नीलकंठ सोसायटीत उघडकीस आलेल्या खूनप्रकरणाने परिसरात खळबळ उडाली आहे. प्रियकराची हत्या करून त्याचा मृतदेह पोत्यात भरत पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप एका महिलेवर असून, मृतदेह लवकर सडावा म्हणून तब्बल २४ तास बाथरूममधील नळ सुरू ठेवल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या प्रकरणातील एका व्हॉइस मेलमुळे पोलिसांना महत्त्वाचा धागा मिळाल्यानंतर तपासाला वेग आला आहे.

**प्रभात हायस्कूल पुसला येथे**

# नरेंद्रचार्यजी महाराज यांच्या अनुयायांकडून वृक्षारोपण

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरूड** – आज पुसला येथे जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्यजी महाराज यांच्या अनुयायांनी प्रभात हायस्कूल पुसला येथे वृक्षारोपण केले. याप्रसंगी ४१ झाडे लावण्यात आली.




पुसला येथील सरपंच तथा प्रशासक श्रीमती सुशीला रमेशपंत श्रीराव यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. रामानंद संप्रदायाचे वामनराव ठाकरे, खेमराज कळमकर, रविंद्र राऊत, सुचिता सोनोने, जयश्री मालपे, माधुरी नखाते, सुचिता जिरापुरे आदी गुरुबंधू, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी प्रभात हायस्कूलचे मुख्याध्यापक विशाल खेरडे, गजानन शिरसाठ, प्रज्ञा खडक्कर, सिध्दार्थ डोंगरे, अभिजीत देवघरे उपस्थित होते तसेच सदर वृक्षारोपण कार्यक्रमास आशिष श्रीराव यांनी सहकार्य केले.

# मराठी नामफलकांच्या अंमलबजावणीचा मुद्दा, दीड महिन्यांपासून आयक्तांसोबत साधी भेट नाही : मुंबई विधी समितीच्या अध्यक्षांनी मौन सोडलं, आता थेट उदय सामंतांकडे दाद मागणार

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – मुंबई महानगरपालिकेत आयुक्त विरुद्ध सत्ताधारी असा संघर्ष पुन्हा एकदा समोर येण्याची चिन्हे आहेत. मात्र, यावेळी हा वाद भाजपकडून नव्हे, तर



सत्तेत सहभागी असलेल्या शिवसेना शिंदे गटाकडून उफाळून आला आहे. विधी समितीच्या अध्यक्षा दीक्षा कारकर यांनी मराठी नामफलकांच्या अंमलबजावणीच्या मुद्द्यावर आयुक्त अश्विनी भिडे यांच्या कार्यपद्धतीवर थेट नाराजी व्यक्त केली आहे.

मराठी नामफलकांची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी गेल्या दीड महिन्यापासून आयुक्तांसोबत बैठकीची वेळ मागूनही ती मिळत नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यामुळे आता त्यांनी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे दाद मागण्याचा निर्णय घेतला आहे. पाच दिवसांपूर्वी स्मरणपत्र, अद्याप आयुक्त कार्यालयाकडून कोणताही प्रतिसाद नाही दीक्षा कारकर यांनी १ जून २०२६ रोजी आयुक्तांना पत्र पाठवून बैठकीची वेळ मागितली होती. त्यानंतर पाच दिवसांपूर्वी स्मरणपत्रही पाठविण्यात आले. मात्र अद्याप आयुक्त कार्यालयाकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यांच्या मते, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर दुकाने आणि आस्थापनांवर मराठी नामफलक अनिवार्य करण्यात आले असले, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक अडचणी आहेत. दुकाने व आस्थापना विभागात १२७ निरीक्षकांची पदे मंजूर असताना केवळ ५७ निरीक्षक कार्यरत आहेत.

**न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट येथे**

# विद्यार्थी प्रबोधन व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरूड** – स्थानिक न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंट येथे अमरावती ग्रामीण पोलीस प्रशासनाच्या वतीने ’ऑपरेशन कवच’ अंतर्गत विद्यार्थी प्रबोधन व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणुन पोलीस उपनिरीक्षक प्रवीण कराळे आणि वाहतुंक पो–लीस संजय रोटवाल प्रामुख्याने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका माधुरी भोंडे होत्या. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या संकल्पनेतून संपुर्ण जिल्ह्यात कायदा, सुव्यवस्था आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी ‘ऑपरेशन कवच’ ही विशेष मोहीम प्रभावीपणे राबवली जात आहे, याच मोहिमेचा भाग म्हणुन शालेय विद्यार्थ्यांना विविध सामाजिक, तांत्रिक आणि रस्ते सुरक्षेच्या विषयांवर जागरुक करण्यात आले.

कार्यक्रमात मुख्य मार्गदर्शक म्हणुन बोलताना पी.एस.आय.प्रवीण कराळे यांनी सद्य:च्या डिजिटल युगातील वाढत्या सायबर गुन्ह्यांवर चिंता व्यक्त केली. त्यांनी विद्यार्थ्यांना सोशल मीडियाचा वापर करताना काळजी घेण्याचे आवाहन केले. अनोळखी व्यक्तींचे फ्रेंड रिक्वेस्ट स्विकारु नयेत आणि आपले वैयक्तिक फोटो किंवा महत्त्वाची माहिती ऑनलाइन शेअर करू नये, असे त्यांनी सांगितले.

१८ वर्षांखालील शाळकरी विद्यार्थ्यांनी वाहने चालवू नयेत लायसन्स नसतांना असे विद्यार्थी आढळल्यास त्यांच्या पालकांवर सक्त कारवाईचा इशारा त्यांनी दिला.

विद्यार्थ्यांनी शाळेत येतांनी व जातांना रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करीत यू टर्न घेऊन प्रवेश करावा असे प्रतिपादन केले.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापिका माधुरी भोंडे यांनी पोलीस विभागाच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. पोलिस विभागामार्फत राबविलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे शाळेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सचिव अनिल गुल्हाने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, सहसचिव शाम खंडेलवाल आणि सदस्य विनय यावलकर आदी सर्व मान्यवरांनी कौतुक केले. याप्रसंगी मुख्याध्यापिका माधुरी भोंडे,समन्वयक श्वेता गणोरकर, पी आर.ओ.किशोर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रि.प्रायमरी विभाग प्रमुख पराग भोंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# बालसभेच्याआयोजनाने आत्मविश्वास, नेतृत्व गुण वाढतो : केंद्रप्रमुख अरविंद वानखडे यांचे प्रतिपादन

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरूड** – जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांतील बालसभा महत्वाची असुन बालसभेच्या नियमित आयोजनाने विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्व गुण व भाषण कौशल्ये विकसित होण्यास मदत होते, असे विचार गाडेगांव केंद्रप्रमुख अरविंद वानखडे यांनी व्यक्त केले.



जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी व उर्दू शाळा वघाळ येथे दर शनिवारी दप्तर मुक्त शाळा अभियानांतर्गत आयोजित बालसभेला प्रमुख पाहुणे म्हणुन ते उपस्थित होते.

याप्रसंगी अरविंद वानखडे यांनी जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक मराठी व उर्दू शाळा वघाळ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध स्पर्धा, उपक्रमांचे आयोजन येथे सातत्याने होत असल्याने विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासाला चालना मिळाल्याचे संगितले.

यावेळी मुख्याध्यापक प्रकाश विंचूरकर यांनी प्रास्ताविकातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. बालसभेमुळे विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण होऊन बालसभेतील भाषण, वादविवाद,नाट्य या सारख्या उपक्रमांमुळे मनातील भीती नाहिशी होते असे म्हणाले.

यावेळी ग्रामगीता जीवन शिक्षण परिक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

व्यासपीठावर उर्दू शाळेचे मुख्याध्यापक अफसर खान, जेष्ठ शिक्षक देवानंद बागडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका रंजना परतेती तर आभार शिक्षक देवानंद बागडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मेघा खोपे, ज्योती चांदूरकर, वनीता शिंदे यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय

**संकटे ही यशाची पायरी असतात, प्रयत्न करणे कधीही सोडू नका**

## शेतकरी व त्याचा मित्र बैल : कष्ट, नातं आणि शेतीसंस्कृतीचा आधार

भारत हा कृषिप्रधान देश म्हणून जगभर ओळखला जातो. देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी आपल्या अथक परिश्रमाने संपूर्ण समाजाला अन्न पुरवतो. शेतकऱ्याच्या या कष्टमय प्रवासात अनेकांनी त्याची साथ दिली, परंतु त्याचा सर्वात विश्वासू, निःस्वार्थी आणि जिवलग साथीदार म्हणजे बैल होय. आधुनिक युगात ट्रॅक्टर, यंत्रसामग्री आणि अत्याधुनिक शेती अवजारांनी बैलांचे स्थान काही प्रमाणात कमी केले असले, तरी शेतकरी आणि बैल यांच्यातील नात्याचे महत्त्व आजही कायम आहे. हे नाते केवळ कामापुरते नसून, ते प्रेम, विश्वास, कष्ट आणि संस्कृतीचे प्रतीक आहे. पूर्वीच्या काळी शेतीची सर्व कामे बैलांच्या साहाय्याने केली जात होती. नांगरणी, वखरणी, पेरणी, मळणी, धान्याची वाहतूक, ऊस किंवा कापसाची ने-आण अशा अनेक कामांत बैलांचा मोलाचा वाटा होता. सकाळपासून संध्याकाळपर्यंत बैल शेतकऱ्यासोबत उन्हात, पावसात आणि थंडीत अविरत काम करत असत. त्यामुळे बैल हा केवळ जनावर नसून शेतकऱ्याच्या कुटुंबातील एक सदस्य मानला जात असे. शेतकरी आपल्या बैलांची अतिशय प्रेमाने काळजी घेतो. त्यांना वेळेवर चारा, पाणी, वैद्यकीय उपचार आणि विश्रांती मिळावी यासाठी तो सदैव प्रयत्नशील असतो. अनेक शेतकरी आपल्या बैलांना नावाने हाक मारतात. बैलही मालकाचा आवाज ओळखतात आणि त्याच्या प्रत्येक आदेशाला प्रतिसाद देतात. माणूस आणि प्राणी यांच्यातील हे निःस्वार्थ प्रेम आजच्या धावपळीच्या जगात प्रेरणादायी आहे. महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीत बैलांचे विशेष स्थान आहे. बैलपोळा हा सण त्याचे उत्तम उदाहरण आहे. या दिवशी बैलांना आंघोळ घालून त्यांची शिंगे रंगवली जातात, अंगावर झूल घातली जाते, फुलांचे हार घालून त्यांची पूजा केली जाते. वर्षभर कष्ट करणाऱ्या या मुक्या साथीदाराप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस असतो. बैलपोळा हा सण केवळ धार्मिक नसून शेतकरी आणि बैल यांच्या जिव्हाळ्याच्या नात्याचे प्रतीक आहे. आज शेतीमध्ये यांत्रिकीकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. ट्रॅक्टर, रोटाव्हेटर, हार्वेस्टर यांसारख्या यंत्रांमुळे कामे जलद आणि कमी वेळात होऊ लागली आहेत. त्यामुळे अनेक ठिकाणी बैलांचा वापर कमी झाला आहे. मात्र लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी बैल आजही महत्त्वाचे आहेत. डोंगराळ भाग, अरुंद शेतरस्ते किंवा लहान शेतांमध्ये बैलांची उपयुक्तता अजूनही कायम आहे. यंत्रे इंधनावर चालतात, पण बैल निसर्गाशी सुसंगत आणि पर्यावरणपूरक शेतीचे प्रतीक आहेत. बैलांमुळे सेंद्रिय शेतीलाही मोठी मदत मिळते. शेण आणि गोमूत्राचा उपयोग खत व जैविक कीटकनाशके तयार करण्यासाठी होतो. त्यामुळे जमिनीची सुपीकता टिकून राहते आणि रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होते. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठीही बैलांचे योगदान महत्त्वाचे आहे.

# मतांसाठीची ‘लाडकी’, सत्तेनंतर ‘अपात्र’!



निवडणुकीत महिलांना ‘लाडकी बहीण’ म्हणत मतांचा जोगवा मागायचा आणि सत्ता मिळाल्यानंतर त्यांना अपात्र ठरवायचे, हा बहिणींचा विश्वासघात आहे. महायुती सरकारची नोंद जनतेला दिलेला शब्द फिरवणारे, स्वतःच्या मतदारांचाच विश्वासघात करणारे, अशी होणार आहे.

लोकशाहीत कोणत्याही सरकारचे मूल्यमापन त्याच्या घोषणा, जाहिराती किंवा प्रचारसभांतील भाषणांवर होत नाही; ते त्याच्या कृतीवर, उत्तरदायित्वावर आणि जनतेशी केलेल्या वचनपूर्तीवर होत असते. निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने आणि निवडणुकीनंतरची प्रत्यक्ष कृती यामध्ये जर दरी निर्माण झाली, तर ती केवळ प्रशासनाची चूक राहत नाही; ती लोकशाहीतील विश्वासघाताची सुरुवात ठरते. महाराष्ट्रातील ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजना सरकारने जनतेशी केलेल्या विश्वासघाताचे जिवंत उदाहरण ठरली आहे. हे केवळ एक उदाहरण नाही तर निवडणुकीत जनतेला आश्वासने, लोककल्याण आणि राजकीय प्रामाणिकता यावर उभा राहिलेला गंभीर प्रश्न आहे.

**मतांसाठी लाडकी**

लोकसभा निवडणुकीत राज्यात जोरदार पिछेहाट झाल्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या काही महिन्यांपूर्वी राज्य सरकारने ‘मुख्यमंत्री लाडकी बहीण’ योजनेची घोषणा केली. दरमहा १,५०० रुपयांच्या आर्थिक मदतीचे आश्वासन दिले. वाढती महागाई, रोजगाराचा अभाव आणि घरगुती खर्चाचा वाढता ताण यामुळे ही योजना लाखो महिलांसाठी दिलासा ठरेल, असे सरकार सांगत होते. सुमारे २.४३ कोटी महिलांची नोंद लाभार्थी म्हणून करण्यात आल्याचा दावा करण्यात आला. सरकारने निवडणुकीत या योजनेचा मोठ्या प्रमाणावर प्रचार करून महिलांना आर्थिक सक्षमीकरणाचे स्वप्न दाखवून त्यांची मते मिळवली.

कॅगच्या अहवालामुळे या योजनेच्या अंमलबजावणीतील गोंधळ आणि त्रुटीबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. लाभार्थी म्हणून नोंद झालेल्या महिलांपैकी सुमारे ३८% महिलांना विविध कारणे देऊन योजनेतून वगळण्यात आले, तर ई-केवायसीच्या कारणाने सुमारे ६२ लाख महिलांचे लाभ थांबवले आहेत. हा केवळ प्रशासनाचा दोष नाही; हा धोरणात्मक अपयशाचा विषय आहे.

**सरकारच्या चुकीची शिक्षा महिलांना का?**

या योजनेचा मूळ उद्देश हा महिलांना मदत करणे नाही तर त्यांची मते मिळवणे हा होता. त्यामुळे लाभार्थ्यांची निवड करताना पुरेशी काळजी घेतली नाही. कुठल्याही पडताळणीविना ज्यांनी अर्ज भरले त्यांना पात्र केले. त्यावेळी सरकारचे आदेश तसेच होते अशी चर्चा मंत्रालयात सुरू होती. अनेक पुरुष, सरकारी कर्मचारी आणि हजारो अपात्र व्यक्तींना योजनेचा लाभ दिला. त्याचवेळी अर्जांची पडताळणी का केली नाही? अपात्र लाभार्थ्यांना पात्र कोणी ठरवले?

अर्जांची पडताळणी करताना कुचराई कोणी केली? आधारकार्ड तपासणी काळजीपूर्वक का केली नाही? वयाची खातरजमा केली होती का? उत्पन्नाचे निकष सुरुवातीलाच का पडताळले नाही? ही संपूर्ण प्रक्रिया सरकारी यंत्रणेनेच पार पाडली, मग त्या चुकीची शिक्षा गरीब महिलांना का? शासनाने केलेल्या प्रशासकीय त्रुटींचा दंड लाभार्थ्यांना देणे हा लोककल्याणकारी राज्याचा मार्ग असूच शकत नाही.

**अपात्र करण्याचा ई-केवायसी फॉर्म्युला**

या संपूर्ण प्रकरणात ई-केवायसी हा शब्द प्रशासनाचा तांत्रिक भाग नसून लाखो महिलांच्या जगण्याचा प्रश्न बनला आहे. सरकार म्हणते ई-केवायसी करा. पण ज्या महिलांकडे स्मार्टफोन नाही, इंटरनेट नाही, डिजिटल साक्षरता नाही, त्या काय करणार? गडचिरोलीतील आदिवासी महिला, नंदुरबारमधील शेतमजूर, बीडमधील ऊसतोड कामगार, ग्रामीण भागातील अशिक्षित महिला यांच्यासाठी ई-केवायसी करणे ही प्रक्रिया किती कठिण आहे याची जाणीव मंत्रालयात बसलेल्या बाबूंना आहे का? पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या डिजिटल इंडियाचा प्रचंड गाजावाजा करतात ती संकल्पना नागरिकांना सक्षम करण्यासाठी आहे की त्यांना योजनांपासून वंचित ठेवण्यासाठी?

जर ६२ लाख महिलांचे ई-केवायसी प्रलंबित होते, तर ग्रामसेवक, तलाठी, अंगणवाडी सेविका, आशा स्वयंसेविका, महा-ई-सेवा केंद्रे आणि जिल्हा प्रशासन यांच्या माध्यमातून राज्यव्यापी विशेष मोहीम का राबवली गेली नाही? लोकांपर्यंत शासन नेण्याऐवजी शासनाने लोकांनाच प्रक्रियेच्या जाळ्यात का अडकवून ठेवावे. घरोघरी जाऊन मतदारयादी पुनरिक्षण प्रक्रियेप्रमाणे ई- केवायसी मोहीम का राबविली नाही?

**कॅगचे ताशेरे**

कॅगच्या अहवालातील निरीक्षणांच्या संदर्भात आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे मंजूर खर्च आणि प्रत्यक्ष खर्चातील तफावत. मंजूर रक्कम आणि प्रत्यक्ष खर्च यामध्ये सुमारे ३,५०० कोटी रुपयांचा फरक असल्याचे अहवालातून समोर आले आहे. हे जास्तीचे ३,५०० कोटी रुपये कुठे खर्च झाले, याची माहिती सरकार का देत नाही? सरकारने या प्रश्नावर सविस्तर श्वेतपत्रिका प्रसिद्ध करावी. पैसा कुठे खर्च झाला? कोणत्या आदेशाने खर्च झाला? जनतेला हे जाणून घेण्याचा घटनात्मक अधिकार आहे. लोकशाहीत सरकारची ताकद बहुमतात नसते; ती पारदर्शकतेत असते.

**२१०० रुपये कधी मिळणार?**

निवडणुकीच्या काळात लाडक्या बहिणींना १,५०० रुपयांवरून २,१०० रुपये देण्याचे आश्वासन महायुतीने दिले होते. सरकार येऊन आता दीड वर्षाहून अधिक काळ उलटला, पण आजही ते पूर्ण झालेले नाही. मग तो शब्द केवळ मतांसाठी होता का? कल्याणकारी योजना या निवडणुकीतील जाहिराती नसतात. त्या सामाजिक न्यायाची साधने असतात. महाराष्ट्राने संजय गांधी निराधार योजना, अन्नसुरक्षा योजना, शिष्यवृत्ती, सामाजिक सुरक्षा योजना अशा अनेक लोकाभिमुख योजनांची परंपरा पाहिली आहे. त्या योजनांचा आत्मा एकच होता– शासन नागरिकांच्या दारी गेले पाहिजे. आज चित्र उलटे दिसते आहे.

नागरिकांनी शासनासमोर स्वतःची पात्रता वारंवार सिद्ध करायची, कागदपत्रे पुन्हा सादर करायची, डिजिटल प्रक्रियेत अडकून पडायचे आणि शेवटी स्वतःच अपात्र ठरायचे ही कोणती लोककल्याणकारी व्यवस्था? आज महाराष्ट्रातील लाखो महिलांच्या मनात एक वेदनादायी प्रश्न आहे. निवडणुकीत आम्ही ‘लाडक्या बहिणी’ होतो; मग निवडणूक संपताच आम्ही ‘अपात्र’ कशा झालो?

**सरकारने उत्तरे द्यावी**

महिलांच्या भावनांवर राजकारण केले का? आर्थिक मदतीचे आश्वासन हे मतपेटीपर्यंत मर्यादित होते का? की प्रशासनाच्या नावाखाली आज त्याच महिलांना त्यांच्या हक्कापासून दूर ठेवले जात आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे सरकारने दिलीच पाहिजेत. सत्य जनतेसमोर आले पाहिजे, जर अपात्र लाभार्थी असतील, तर त्यांची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. जर प्रशासनाने चूक केली असेल, तर अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे आणि जर लाखो पात्र महिलांना अन्यायाने वगळले गेले असेल, तर त्यांना तातडीने न्याय मिळाला पाहिजे.

लोकशाहीत जनतेला दिलेले आश्वासन हा राजकीय करार असतो; निवडणुकीतील जुमला नव्हे. कल्याणकारी योजना ही सरकारची मेहेरबानी नसून प्रत्येक पात्र नागरिकाचा घटनात्मक हक्क आहे. निवडणुकीत महिलांना ‘लाडकी बहीण’ म्हणत मतांचा जोगवा मागायचा आणि सत्ता मिळाल्यानंतर त्यांना अपात्र ठरवायचे, हा बहिणींचा विश्वासघात आहे. सत्ता मतांनी मिळते; पण ती जनतेच्या विश्वासावरच टिकते. विश्वास तुटला की सत्तेचा पाया ढासळायला वेळ लागत नाही.

इतिहासात आश्वासनांची नव्हे, तर त्या आश्वासनांशी प्रामाणिक राहणाऱ्या किंवा त्यांचा विश्वासघात करणाऱ्या सरकारांची नोंद होते. जर लाखो महिलांच्या विश्वासाशी खेळण्याची हीच भूमिका कायम राहिली, तर महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात महायुती सरकारची नोंद जनतेला दिलेला शब्द फिरवणारे, स्वतःच्या मतदारांचाच विश्वासघात करणारे आणि लोककल्याणाच्या नावाखाली राजकारण करणारे सरकार म्हणूनच होईल.

# महसूल आयुक्तालयाचा प्रश्न प्रलंबित



मराठवाड्यात गेल्या १६ वर्षांपासून नवीन महसूल आयुक्तालयाची प्रतीक्षा आहे. नांदेड की लातूर या दोन जिल्ह्यांच्या मागणीमुळे नवीन महसूल आयुक्तालयाचा प्रश्न प्रलंबित आहे. मराठवाड्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे महसूल आयुक्तालय आहे. त्याचे विभाजन करून चार जिल्ह्यांसाठी नवीन महसूल आयुक्तालय करणे अत्यंत गरजेचे आहे. महसूल आयुक्तालयामुळे प्रशासन अधिक सक्षमतेने तसेच पारदर्शक आणि जलद गतीने कार्य करते. त्याचा थेट फायदा सामान्य नागरिकांना होऊ शकतो.

नांदेडमध्ये चार जिल्ह्यांसाठी स्वतंत्र महसूल आयुक्तालयाची मागणी होत आहे. नांदेड, परभणी, लातूर, हिंगोली या चार जिल्ह्यांचे कार्यक्षेत्र नवीन महसूल आयुक्तालयात राहणार आहे. वारंवार प्रयत्न करूनही नांदेड व लातूरचे सत्ताधारी हा प्रश्न सोडवू शकलेले नाहीत.

नांदेड जिल्ह्यातील ९ आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची काही दिवसांपूर्वी भेट घेऊन 'नांदेड येथे स्वतंत्र महसूल आयुक्तालय करावे', अशी मागणी केली. नांदेड जिल्ह्यातील सत्ताधारी आमदारांनी वज्रमुठ आवळली आहे. नांदेड, हिंगोली, परभणी आणि लातूर या चार जिल्ह्यांसाठी स्वतंत्र महसूल आयुक्तालय नांदेडमध्ये स्थापन करण्याबाबत १६ वर्षांपासून प्रयत्न सुरू आहेत. कुठल्या ना कुठल्या कारणावरून हा प्रश्न वारंवार टाळला जातो.

या प्रयत्नाला लातूरचे राजकारणी खोडा घालत आहेत. महसूल आयुक्तालय लातूरला व्हावे, अशी त्यांची मागणी आहे. या एका मुद्द्यावरून मराठवाड्यात दुसरे महसूल आयुक्तालय होऊ शकलेले नाही. लातूरवासीयांना नांदेडला स्वतंत्र महसूल आयुक्तालय नको आहे. भौगोलिक दृष्ट्या विचार करता चार जिल्ह्यांसाठी नांदेड हे मध्यभागी असलेले ठिकाण आहे. परभणी व हिंगोलीवासीयांसाठी नांदेड हेच संयुक्तिक आहे.

असे असताना लातूरवासीयांनी नांदेडला विरोध करणे कितपत योग्य आहे, असा सवाल नांदेड जिल्ह्यातील राजकारणी व सामाजिक कार्यकर्ते तसेच जनता उपस्थित करत आहे. चार जिल्ह्यांचा विचार करता भौगोलिकदृष्ट्या नांदेड की लातूर योग्य याची विचारणा केली तर कोणीही नांदेडच योग्य असेच उत्तर देईल. नांदेडला या नवीन महसूल आयुक्तालयासाठी जमीन देखील निश्चित करण्यात आलेली आहे. असे असताना लातूरच्या राजकारण्यांनी कशामुळे हा हट्ट चालविला आहे हे त्यांनाच ठाऊक, असा सवाल मुख्यमंत्र्यांकडे नांदेड जिल्ह्यातील सत्ताधारी आमदारांनी प्रत्यक्ष भेटीत केला.

नांदेडकरांच्या जिव्हाळ्याचा विषय असलेल्या महसूल आयुक्तालयाबाबत शासनही काही निर्णय घेत नसल्याने सत्ताधाऱ्यांविषयी प्रचंड नाराजी पसरली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मराठवाड्याचा संपूर्ण अभ्यास आहे. नांदेड व लातूरच्या भांडणात स्वतंत्र महसूल आयुक्तालयाचा प्रश्न गेल्या १६ वर्षांपासून प्रलंबित आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नांदेड जिल्ह्यातील सर्वपक्षीय ९ आमदारांनी भेटून हा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली. शासनाला कुठलाही विषय प्रलंबित ठेवायचा असेल, तर अभ्यासगट स्थापन करून त्यावर विचार करण्यात येईल, असे सांगितले जाते. महसूल आयुक्तालयाच्या बाबतीत तसेच घडले.

२०१५ मध्ये सरकारने अभ्यासगट स्थापन करून हा विषय लालफितीत अडकविला.दिवसेंदिवस वाढणारी लोकसंख्या तसेच नागरिकांची प्रत्यक्ष गरज लक्षात घेऊन हा विषय तत्काळ मार्गी लावणे अत्यंत आवश्यक आहे. मागील १६ वर्षांच्या तुलनेत मराठवाड्याच्या लोकसंख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्याचबरोबर भौगोलिक क्षेत्राचा विस्तारही मोठ्या प्रमाणात झालेला आहे. त्यामुळे आता आणखी जास्त दिवस महसूल आयुक्तालयाचा विषय रेंगाळत ठेवणे म्हणजे मराठवाडावासीयांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार होय.

## राशिभविष्य

**मेष :** नवा विचार प्रत्यक्षात उतरवण्याची संधी मिळेल. घाईपेक्षा संयम अधिक फायदेशीर ठरेल. जुन्या मित्राशी अर्थपूर्ण संवाद होईल.

**वृषभ :** आर्थिक नियोजनाला दिशा मिळेल. कुटुंबात आनंदाची बातमी मिळेल. कामात सातत्य ठेवल्यास यश जवळ येईल. स्वतःला वेळ द्या.

**मिथुन :** अनपेक्षित भेट दिवस खास बनवू शकते. नवीन जबाबदारी आत्मविश्वास वाढवेल. शब्दांचा योग्य वापर नाते जपेल. लहान यशाचा आनंद घ्या.

**कर्क :** मनातील शंका दूर करण्यासाठी संवाद साधा. घरातील वातावरण सकारात्मक राहील. जुने अपूर्ण काम पूर्ण करण्याची संधी मिळेल.

**सिंह :** कल्पनांना चांगला प्रतिसाद मिळेल. नेतृत्वगुण दाखवण्याची वेळ येईल. खर्चावर नियंत्रण आवश्यक आहे. आनंददायी बातमी मिळेल.

**कन्या :** छोटे बदल मोठा फरक घडवतील. कामातील शिस्त तुमची ताकद ठरेल. जवळच्या व्यक्तीकडून मोलाचा सल्ला मिळेल. प्रवासाचा योग.

**तूळ :** जुन्या आठवणी प्रेरणा देतील. निर्णयात मन आणि बुद्धीचा समतोल ठेवा. पारदर्शकता लाभदायी ठरेल. दिवस समाधानी जाईल.

**वृश्चिक :** धाडसी पाऊल उचलण्याची वेळ येऊ शकते. गैरसमज शांतपणे दूर करा. कामात अनपेक्षित मदत मिळेल. स्वतःवरचा विश्वास वाढेल.

**धनू :** नवीन अनुभवातून धडा मिळेल करिअरबाबत सकारात्मक घडामोडी होतील. कुटुंबासोबत वेळ घालवा. मन शांत होईल.

**मकर :** संयमामुळे प्रश्न सुटतील. जुनी योजना पुन्हा सुरू करण्यास हरकत नाही. आर्थिक सावधगिरी बाळगा. दिवस समाधान देईल.

**कुंभ :** नवीन ओळख भविष्यात उपयोगी ठरेल. सर्जनशील विचारांना वाव मिळेल. निर्णयात कुटुंबाचा पाठिंबा मिळेल. ताण कमी होईल.

**मीन :** इच्छा व्यक्त करण्याची योग्य वेळ आहे. कौतुक होईल. लहान प्रवास आनंददायी ठरेल. आशावादी दृष्टिकोन दिवस उजळवेल.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# जम्मूत ढगफुटी : ११ जणांचा मृत्यू

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**जम्मू** – जम्मू-काश्मीरच्या पूंछ आणि राजौरी या दोन्ही सीमावर्ती जिल्ह्यांत रविवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे भूस्खलन आणि अचानक आलेल्या पुरामुळे किमान ११ जणांचा मृत्यू झाला असून अन्य सात जण बेपत्ता झाले आहेत. या घटनेनंतर अनेक यंत्रणांच्या माध्यमातून युद्धपातळीवर बचाव मोहीम सुरू करण्यात आली आहे. या पुरात २५० हून अधिक गाडया वाहून गेल्या आहेत. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पूंछ जिल्ह्यातील सुरणकोट तहसीलमध्ये सर्वात जास्त नुकसान झाले आहे. बहुतांश मृत्यू याच भागात झाले आहेत. सतत सुरू असलेला पाऊस आणि खराब रस्त्यांमुळे बचाव पथकांच्या कार्यात अडथळे निर्माण होत आहेत. अधिकाऱ्यांनी सांगितले की, रविवारी पहाटे मुसळधार पावसामुळे सुरनकोटमधील लोअर मुराह गावात भूस्खलन होऊन एक घर कोसळले.

# नागपूरच्या अशोका रेस्टॉरंटमध्ये सूपमध्ये झुरळ सापडलं

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

## एफडीएने धाड टाकली, फ्रिजमधील मांस पाहून लायसन्स सस्पेंड



**नागपूर** – अन्न आणि औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गेल्या काही काळापासून भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधात धडक मोहिम सुरू केलीये.

त्यांनी आतापर्यंत अनेक कंपन्यांसह बड्या हॉटेलमध्ये सुरू असलेल्या भोंगळ कारभाराचा पर्दाफाश केला. तसेच कंपन्यांचे नियमांचे उल्लंघन देखील उघडकीस आणले. नुकतंच, तुकाराम मुंढे यांच्या एफडीए विभागाने नागपूरातील प्रसिद्ध मिष्ठान भंडार 'श्री हीरा स्वीट्स'मध्ये धडक कारवाई केली होती. यावेळी किचनची तपासणी केली असता तिथे टीमला चक्क मेलेले उंदिर सापडले. यानंतर 'श्री हीरा स्वीट्स' वर अन्न आणि औषध प्रशासन विभागाने कारवाईचा बडगा उगारण्यात आला होता. हि कारवाई ताजी असतानाच नागपूरच्या सदर भागातील अशोका रेस्टॉरंटमध्ये ग्राहकाला दिलेल्या सूपमध्ये चक्क मेलेला झुरळ आढळल्याने पुन्हा एकदा शहरात खळबळ उडाली आहे. सूपमध्ये झुरळ सापडलं, फ्रिजमधील मांस पाहून एफडीएने लायसन्स सस्पेंड केलं मिळालेल्या माहितीनुसार, नागपुरातील कुणाल नरसापूरकर हे सदर भागातील अशोका रेस्टॉरंटमध्ये जेवणासाठी गेले असता त्यांनी सुरवातीला सूपचे ऑर्डर दिली.

## नॅशनल इंग्लिश स्कूल येथे

# समाजसुधारक अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी



■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – छत्रपती शाहू महाराज संचालित नॅशनल इंग्लिश स्कूल येथे थोर साहित्यिक, शाहीर व समाजसुधारक अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक विनोद भोंगाडे सर होते. याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थी व शिक्षकांनी अण्णाभाऊ साठे यांचे जीवन, साहित्य व समाजकार्य यावर प्रभावी भाषणे सादर केली.

विद्यार्थ्यांनी अण्णाभाऊ साठे यांचे क्रांतिकारी पोवाडे व गीते सादर करून वातावरण भारावून टाकले.

यावेळी 'जातिभेद मिटवा, शिक्षण घ्या व एक रहा' या अण्णाभाऊंच्या विचारांचा सर्वांनी संकल्प केला.

याप्रसंगी बोलताना मुख्याध्यापक विनोद भोंगाडे म्हणाले, 'अण्णाभाऊ साठे हे दलित साहित्याचे जनक आहेत. त्यांनी आपल्या लेखनातून कष्टकरी व शोषितांच्या व्यथा मांडल्या. आजच्या तरुण पिढीने त्यांचे विचार आत्मसात करून समाज प्रगतीसाठी कार्य केले पाहिजे. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# अस्वच्छ अन्नाबाबत पुण्यातून तक्रारींचा भडीमार

# एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांची माहिती

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – महाराष्ट्रात अस्वच्छ अन्नाबाबत सर्वाधिक तक्रारी पुणे जिल्ह्यातून मिळत आहेत, अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाचे (एफडीए) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिली आहे.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरतर्फे आयोजित अन्न सुरक्षा परिषदेला उपस्थित राहण्यासाठी हे मुंढे हे शनिवारी आले होते. पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, अन्नपदार्थांशी संबंधित तक्रारी नागरिकांना नोंदवता याव्यात यासाठी एफडीएने



अलीकडेच 'लोश्रिरळपींी.ारहरषवर.ळप हे पोर्टल सुरू केले आहे. हे पोर्टल कार्यान्वित झाल्यानंतर हजारो तक्रारींचा ओघ सुरू झाला आणि पहिल्या २४ तासांतच या पोर्टलला १० लाख लोकांनी भेट दिली, असे त्यांनी सांगितले. राज्यातील तक्रारींच्या वितरणाबाबत विचारले असता ते म्हणाले, 'सर्वाधिक तक्रारी पुणे जिल्ह्यातून नोंदवल्या गेल्या असून, त्यातील बहुतांश तक्रारी या अस्वच्छ अन्नाशी संबंधित आहेत.' या नवीन व्यवस्थेमुळे उत्तरदायित्व आणि पारदर्शकता येईल, असेही ते म्हणाले.

संबंधित विभागाचे एफडीएचे सहआयुक्त नोंदवलेल्या तक्रारीची २४ तासात दखल घेतील. त्यांना ही तक्रार एका अधिकाऱ्याकडे सोपवावी लागेल. त्यांनी विहित मुदतीत आवश्यक ती कारवाई न केल्यास, ती तक्रार आपोआप विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याकडे वर्ग केली जाईल.

# केंद्र बेजबाबदार : शरद पवार

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – नीट परीक्षा गैरव्यवहार आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्येप्रकरणी जंतरमंतर येथे उपोषणाला बसलेले प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाची केंद्र सरकारने अत्यंत 'बेजबाबदार' पद्धतीने हाताळणी केल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शनिवारी केला. केंद्र सरकार विद्यार्थ्यांच्या रास्त मागण्यांकडे लक्ष देण्याऐवजी केवळ मूकदर्शक बनून राहिले, असा टोला त्यांनी लगावला.

बारामती येथे शरद पवार यांनी पत्रकारांना सांगितले की, सोनम वांगचुक यांची प्रकृती चिंताजनक झाल्यानंतर सरकारने त्यांना रुग्णालयात दाखल केले असले, तरी त्यांच्यावरील या कारवाईने आंदोलन थांबणार नाही, तर ते अधिक तीव्रतेने सुरूच राहील.

केंद्र सरकारच्या एकाही नेत्याने आंदोलनस्थळाला भेट दिली नाही. यावरून हे सरकार किती बेजबाबदार आहे हे स्पष्ट होते. हा मुद्दा इथेच संपणारा नाही. लवकरच संसदेचे अधिवेशन सुरू होत असून, या विषयावर संसदेतही जोरदार चर्चा आणि जाब विचारला जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

# मी बोलायला लागलो तर सुनील तटकरेंचं पितळ उघडं पडेल, रामदास कदमांच्या मुलाचा पलटवार

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

## 'आता कॉम्प्रमाईजला स्कोपच उरलेला नाही'



**मुंबई** – कोकणातील महायुतीतील दोन महत्त्वाचे घटक पक्ष असलेले शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यातील अंतर्गत धुसफूस आता टोकाच्या वळणावर पोहोचली आहे. शिवसेना नेते रामदास कदम आणि राष्ट्रवादीचे खासदार सुनील तटकरे यांच्यातील वाद अधिकच चिघळला असून, आता रामदास कदम यांचे सुपुत्र आणि मंत्री योगेश कदम यांनी तटकरेंवर जोरदार पलटवार केला आहे. 'तटकरे यांच्या वक्तव्यानंतर कुठेही कॉम्प्रमाईज साठी जागा राहिली नाही, आता हे मिटेल असं मला वाटत नाही,' असा स्पष्ट इशारा देत योगेश कदमांनी महायुतीतील संघर्षाची धार अधिक तीव्र केली आहे. तटकरे यांनी रामदास कदम यांच्यावर केलेल्या टीकेनंतर योगेश कदम चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. योगेश कदम म्हणाले, 'सुनील तटकरे यांच्या वक्तव्यानंतर कुठेही कॉम्प्रमाईजसाठी जागा राहिली नाही. पण मला खोलात पडायचं नाही.' याचवेळी त्यांनी मागील निवडणुकांचा उल्लेख करत सूचक विधान केले. 'मागच्या विधानसभेला आणि लोकसभेला कोणी कोणाला मदत केली हे समोर आलं तर पितळ उघडे पडेल,' असे योगेश कदम म्हणाले. त्यांच्या या वक्तव्यामुळे महायुतीतील अंतर्गत मतभेद आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यापूर्वी रामदास कदम यांनी राष्ट्रवादीचे खासदार सुनील तटकरे यांच्यावर अत्यंत जहरी शब्दांत टीका केली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीदरम्यान प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे उपस्थित असल्याच्या पार्श्वभूमीवर रामदास कदम यांनी तटकरेंवर टीका केली होती.

# घरात प्रवेश करुन महिलेचा विनयभंग

## तालुक्यातील आलोडा येथील घटना

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – महिला घरात झोपली असतांना तिच्या घरामध्ये प्रवेश करुन तिचा विनयभंग केल्याची घटना तालुक्यातील आलोडा येथे घडली. या प्रकरणी पोलिसांनी एका युवकाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी प्राप्त माहीतीनुसार, फिर्यादी महिला ही रात्री परिवारासह जेवण करुन झोपली असता १७ जुलैचे रात्री २.३० वाजता आरोपी हरीष गावंडे हा तेथे आला व फिर्यादी महिलेचे छातीला दाबुन शरिराला स्पर्श करत होता. फिर्यादीला जाग आली व तिने पाहले तर नमुद आरोपी हरीष हा तिचे दिवाणवर बसलेला दिसला. नमुद आरोपी याने फिर्यादी महिलेचे छातीला दाबुन शरिराला स्पर्श करुन लज्जा निर्माण होणार असे कृत्य केले. या प्रकरणी फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरुन बेनोडा शहीद पोलिसांनी आरोपी हरीष पंढरी गावंडे (३२) रा.आलोडा याचे विरुध्द कलम ७४, ७५ (१) (आय) ७५ (२) ३३२ (सी ) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.

## जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये

# अण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)




**वरुड** – कला व वाणिज्य महाविद्यालय जरुड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुण्यतिथी निमित्य त्यांना अभिवादन करण्यात आले.

सर्वप्रथम प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. याप्रसंगी डॉ.जी.आर.तडस यांनी अण्णाभाऊ साठे हे एक मराठी लोककवी,लेखक आणि समाज सुधारक होते.त्यांचे लेखन सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या कृतीवर आधारलेले होते. समाजाला नवी दिशा देण्याचे काम अण्णाभाऊंनी आपल्या कृती आणि उक्तीतून केले. तर प्रमुख अतिथी प्रा.उदय ठाकरे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी शोषित, वंचित आणि दुर्लक्षित समाजाच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढा दिला. त्यांनी आपल्या लेखणी व लोककलेच्या माध्यमातून समाजात जागृती निर्माण केली, जातीभेद व आर्थिक विषमतेविरुद्ध आवाज उठवला, असे प्रतिपादन केले.

याप्रसंगी डॉ.विनायक भटकर, डॉ.राम कुलसंगे, डॉ.विष्णु पडवाल, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शाशिकांत काळे, प्रमोद पाटील, निलेश खुरद, अर्चना राऊत, प्रा.प्रदीप आवारे, योगेश कासे, निलेश बंदे, रासेयो स्वयंसेवक तनुजा पोकळे, आदित्य उमेकर, किरण खंते, रागिनी बारमासे, कृतिका चरपे, गायत्री भंडारे, कृणाल चव्हाण, अजय ढोमणे, यामिनी काळमेघ, सारिका मरस्कोल्हे, नेहा कांडलकर इत्यादी विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

## लोणीच्या श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयात

# नवनियक्त वर्गनायक व उपनायकांचा शपथविधी समारोह

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – शिक्षण प्रसारक मंडळ लोणी द्वारा संचालित श्रीमती रामप्यारीबाई चांडक विद्यालयात यावर्षीच्या नवीन शैक्षणिक सत्रातील सर्व वर्गाच्या नायक व उपनायकांची निवड सर्व वर्गशिक्षकांनी मतदान प्रक्रिया राबवुन केली.

ज्यामध्ये मधून यशस्वी भुषण धोटे, पुर्वा किशोर मालपे, राम श्रीकांत देवघरे, प्रजत अजय बावणे, अर्णव प्रविण झाडे, गुंजन विजय तिखे, आदिश्री हिरालाल पाचघरे, क्रिष्णा जगदिश लांडे, गुंजन योगेश आकोटकर, गौरव नरेंद्र बोडखे, शुभ्रा नकुल भोगे, सार्थक निलेश अनासाने, अंतरा उमेश अकर्ते, युवराज धिरेंद्र कापसे, रेणुका आकाश भोपळे, मयंक अशोक उंदरे, रुचा रविंद्र उमेकर, मानव चंद्रशेखर गलफट, अनुष्का अतुल गुल्हाने, प्रथम प्रविण मेंढे, पलक कृष्णराव टेकाम, अभय सहदेव राईकवार, धवल भुषण चोरोडे, कार्तिकी जगदिश देशमुख, रोहन जगदिश नेरकर, उन्नती सचिन वानखडे या सर्व विद्यार्थ्यांची विद्यार्थी प्रतिनिधी म्हणुन निवड झाल्याबद्दल शालेय प्रशासनाच्या वतीने सत्कार व शपथविधी समारोहाचे आयोजन आनंददायी शनिवारी करण्यात आले.

शाळेतील सहायक शिक्षक डी.पी.खोडे यांनी विद्यार्थांना उपस्थित सर्वांच्या साक्षीने कर्तव्य व जबाबदारीची शपथ दिली.

मुख्याध्यापक एस.व्ही.खोडे, पर्यवेक्षक व्ही.एच.चिमोटे तसेच सर्व शिक्षकांनी नवनियुक्त नायक व उपनायकांना यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

# उगवणक्षमता नसलेली सोयाबीन बियाणे विक्री केल्यासंबंधी संबंधित बियाणे कंपन्यांवर तात्काळ गुन्हा नोंदवा

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन

## जिल्हा नियोजन समितीतील २०२६ -२७ या आर्थिक वर्षातील सर्व प्रशासकीय मान्यता १५ सप्टेंबरपर्यंत घ्याव्यात

## लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन विकास कामे करा



(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – उगवणक्षमता नसलेली सोयाबीन बियाणे विक्री केल्यासंबंधी संबंधित कंपन्यांवर तात्काळ गुन्हा नोंदवा. कृषी अधिकाऱ्यांनी आपआपल्या तालुक्यात आजच पाचही बियाणे कंपन्यांवर गुन्हे दाखल करा. चौदाही तालुक्यात हे गुन्हे दाखल करण्यात यावे. पोलीस अधीक्षकांनी पुढाकार घेऊन तात्काळ या गुन्ह्यांची नोंद करावी, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात पालकमंत्री बावनकुळे यांनी जिल्हा नियोजन समितीची बैठक घेतली, त्यावेळी ते बोलत होते.

खासदार बळवंत वानखडे, अमर काळे, डॉ.अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, प्रवीण पोटे-पाटील, ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, सुलभा खोडके, रवी राणा, प्रतापदादा अडसड, राजेश वानखडे, प्रवीण तायडे, उमेश उर्फ चंदू यावलकर, गजानन लवटे, केवलराम काळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस आयुक्त राकेश ओला, मनपा आयुक्त मंगेश गोंदवले, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, पोलीस अधीक्षक निकेतन कदम, जिल्हा नियोजन अधिकारी भारत वायाळ आदी यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री बावनकुळे म्हणाले, लोकाभिमुख पारदर्शी आणि गतिमान सरकार हे आपले उद्दिष्ट आहे. शेतकऱ्यांची बियाण्यांच्या बाबतीत फसवणूक करणाऱ्या बूस्टर कंपनी, इनोवेज कंपनी, रवी सीड्स, पार्श्व कंपनी, श्री श्री सीड्स तसेच ग्रीन गोल्ड या कंपन्यांवर तात्काळ गुन्हे नोंदवा. त्या गुन्ह्यांची प्रत उद्या जिल्हाधिकारी महोदयांकडे सादर करा. पोलीस अधीक्षकांनी यावर तात्काळ कार्यवाही करण्याबाबत पोलीस विभागाला निर्देश द्यावे. तसेच या कंपन्यांना ब्लॅक लिस्ट करण्यात यावे. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांना माफी मिळणार नाही, असेही ते यावेळी म्हणाले.

कृषी अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींशी भेटू शेतकऱ्यांची परिस्थिती वेळीच अवगत करणे अपेक्षित आहे. लोकप्रतिनिधीशी समन्वय साधून विकास कामे करण्यात यावी. सर्व विभागांनी वृक्ष लागवडीचे दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे. सध्याची परिस्थिती तसेच पुढील वर्षीचा विचार करता दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण होऊ शकते. यासाठी पिण्याच्या पाण्याचा काटकसरीने वापर करावा. शिवकालीन बंधारे मजबूत करण्यात यावे. जुन्या विहिरी, ब्रिटिश तलाव पुनर्जीवित करण्यात यावे. जिल्हा नियोजन समितीचा प्रस्ताव सादर करताना यंदा एकही सिमेंट रस्त्याचे बांधकाम करू नये. जलसंधारणाच्या कामावर भर द्यावा, जल साठे वाढविणे, जमिनीत पाणी मुरविणे यासह मृदा संधारण सामाजिक वनीकरण यावर द्यावा. आवश्यकता असल्यासच शेत रस्त्यासाठी डांबरीकरण किंवा खडीकरण करण्यात यावे. सर्वांनी बचतीचे धोरण अवलंबावे. महावितरणाची वीज न वापरता सौर उर्जेचा वापरावर भर द्यावा. सौर ऊर्जेवर चालणारे दिवे लावावे. सर्व संबंधित विभागांनी क्षेत्रीय भेटीवर भर द्यावा. लोकप्रतिनिधी व शासन यांनी एकत्रित येऊन लोकाभिमुख प्रशासन राबविण्यावर भर द्यावा, असे पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले.

या बैठकीत जिल्ह्याच्या विकासकामांचा आणि खर्चाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या बैठकीत प्रामुख्याने आर्थिक वर्ष २०२५-२६ मधील विविध योजनांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली. यामध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत मंजूर ५२७ कोटी रुपये आणि विशेष घटक योजनेचे १०२ कोटी रुपये १०० टक्के वितरित झाले आहेत. तसेच आदिवासी उपयोजनेचा १२१.५३ कोटींपैकी ९९.९९ टक्के निधी वितरित करण्यात आला असून, प्रशासकीय मंजुरीनंतर या तिन्ही योजनांचा निधी खर्च झाल्याचे सांगण्यात आले.

यासोबतच चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या नियोजनावरही चर्चा झाली. नवीन वर्षासाठी सर्वसाधारण योजनेअंतर्गत ६०५ कोटी रुपये, विशेष घटक योजनेसाठी १०० कोटी रुपये तर आदिवासी उपयोजनेसाठी १३३.२८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. जून २०२६ अखेरपर्यंत या नवीन निधीमधील आदिवासी उपयोजनेअंतर्गत ३९.३५ कोटी रुपयांचा निधी प्रत्यक्ष खर्च झाला आहे, तर इतर योजनांच्या प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया सुरू आहे. पालकमंत्री बावनकुळे यांनी जिल्ह्याचा विकास वेगाने साधण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणांनी उपलब्ध निधीचा वापर वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने करावा, अशा सूचना दिल्या.

यावेळी शहरातील शाळा, रस्ते, क्रीडांगण, शहरातील वाढीव पाणीपुरवठा, वन्यप्राण्यांचा त्रास, अवैध बांधकाम, आरोग्य व्यवस्था शहरातील न्याय व सुरक्षा व्यवस्था याबाबत आढावा घेऊन संबंधितांना निर्देश देण्यात आले. जिल्ह्यातील नागरिकांचे रक्षण करणे आणि नागरिकांच्या मालमत्तेचे रक्षण करणे या संविधानाने प्रशासनाला दिलेल्या प्रमुख जबाबदाऱ्या आहेत. शहरात सर्वत्र सीसीटीव्ही एआयच्या माध्यमातून सुरक्षा व्यवस्था अचूक करण्यात येणार आहे .ग्रामीण भागातील सुरक्षाव्यवस्था अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात येणार आहे. कोणत्याही विभागाचे खाजगी बँकेत खाते नसावे, केवळ लीड बँकेतच खाते असावे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाने शेतकऱ्यांचे शेतीमालांनी भरलेले ट्रॅक्टर, ट्रक अडवू नये. विमुक्त जाती आणि भटक्या जमाती यांच्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजनांचा त्यांना त्वरित लाभ मिळवून देण्यात यावा, असेही पालकमंत्री यावेळी म्हणाले आहे.

# नोंदणीकृत कंपन्यांच्या ऑडिटसाठी सेबीने केली उपाययोजना

## ऑडिटर पॅनेलमध्ये नव्या कंपन्या

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**नवी दिल्ली** – बाजार नियामक सेबीने नोंदणीकृत कंपन्यांच्या वित्तीय विवरणांचे फॉरेन्सिक ऑडिट करण्यासाठी अर्न्स्ट अँड यंग एलएलपी, केपीएमजी अश्योरन्स अँड कन्सलटिंग सर्व्हिसेस एलएलपी, ग्रँट थॉर्नटन भारत एलएलपी आणि नांगिया अँड कंपनी एलएलपी यांच्यासह आणखी १८ अतिरिक्त कंपन्यांचा पॅनेलमध्ये समावेश केला आहे.

नोव्हेंबर २०२५ मध्ये जारी करण्यात आलेल्या सार्वजनिक खरेदी सूचनेद्वारे सुरू झालेल्या निवड प्रक्रियेनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

नियामकाने १५ जुलै रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, नव्याने निवडलेल्या कंपन्या या सेबीने एप्रिल २०२५ मध्ये प्रसिद्ध केलेल्या फॉरेन्सिक ऑडिटर्सच्या यादीव्यतिरिक्त असणार आहेत. ही नवीन यादी प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी वैध राहील.

नांगिया अँड कंपनी एलएलपीच्या फॉरेन्सिक ॲडव्हायझरीचे वरिष्ठ भागीदार श्रीनिवास राव म्हणाले की, हा समावेश आमच्या फॉरेन्सिक सेवांमधील कौशल्याची आणि पारदर्शकता व गुंतवणूकदारांच्या संरक्षणाला पाठबळ देण्याच्या आमच्या वचनबद्धतेची साक्ष देतो. सेबीच्या पॅनेलमध्ये आमचा समावेश झाल्याचा आम्हाला अत्यंत अभिमान आहे. हे आमच्या टीमच्या सखोल कौशल्याचे आणि फॉरेन्सिक उत्कृष्टतेप्रती असलेल्या दृढ समर्पणाचे प्रतीक आहे. श्रीनिवास राव म्हणाले की, स्वतंत्र फॉरेन्सिक ऑडिटच्या माध्यमातून एक न्याय्य, कार्यक्षम आणि पारदर्शक रोखे बाजार राखण्याच्या सेबीच्या प्रयत्नांमध्ये मोलाचे योगदान देण्यासाठी त्यांची कंपनी उत्सुक आहे. सेबीच्या फॉरेन्सिक ऑडिट पॅनेलमध्ये अशा कंपन्यांचा समावेश केला जातो ज्यांना वित्तीय गैरव्यवहारांचा संशय असलेल्या प्रकरणांमध्ये नोंदणीकृत कंपन्यांचे फॉरेन्सिक ऑडिट करण्याचा अधिकार नियामकाद्वारे दिला जातो. बाजारातील पारदर्शकता आणि गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढवणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

# धारदार शस्त्र घेऊन आले आणि सपासप वार केला : शिर्डी साई मंदिराबाहेर महिलेवर हला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – साईबाबांच्या शिर्डी मंदिर परिसरात शनिवारी एक धक्कादायक घटना घडली. साई मंदिराच्या प्रवेशद्वार क्रमांक ४ समोर एका महिलेवर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. भर गर्दीत झालेल्या या प्रकारामुळे मंदिर परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. या हल्ल्यात जयश्री साईनाथ क्षीरसागर (वय ३०) या महिला गंभीर जखमी झाल्या आहेत. त्या मंदिर परिसरात काकडी आणि कैरी विक्रीचा व्यवसाय करत असल्याची माहिती समोर आली आहे. जखमी महिलेला तातडीने साई संस्थानच्या सुपर स्पेशालिटी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. डॉक्टरांकडून त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. प्राथमिक माहितीनुसार, मंदिर परिसरात स्टिकर विक्री करणाऱ्या ४ ते ५ महिलांनी जयश्री यांच्यावर अचानक धारदार शस्त्राने हल्ला केला. या घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच शिर्डी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला असून संबंधितांविरोधात गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, जखमी महिलेच्या पतीने या घटनेबाबत संताप व्यक्त केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, जयश्री अनेक वर्षांपासून मंदिर परिसरात व्यवसाय करत असून त्यांचा कोणाशीही वाद नव्हता. अचानक काही महिलांनी चाकूने हल्ला केल्याची माहिती मिळाल्याचे त्यांनी सांगितले.


## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६०२/२०२६** **ने.ता.२१/०८/२०२६**

**अर्जदार :-**

१) श्रीमती कमला विष्णुजी काळे, वय अं.७२वर्ष, धंदा-गृहीणी

२) संगिता उल्हास नेरकर, वय अं.५२ वर्ष, धंदा- गृहीणी

दोन्ही रा.वरुड, ता.वरुड, ह.मु.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत विष्णु रामचंद्र काळे, मयत प्रमोद विष्णु काळे व मयत योगिता दिलीप कोरडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२१/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१५/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६०३/२०२६** **ने.ता.२५/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती विमल दिगांबर निकम, वय अं.५८ वर्ष, धंदा-गृहीणी, रा.वार्ड क्र.१ वडाळा, ता.वरुड, २) सौ.सविता भोजराज सोनारे, वय अं.४२ वर्ष, धंदा- मजुरी, रा.वार्ड क्र.१, मेन रोड, वडाळा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत दिगांबर माणिकराव निकम, रा.वडाळा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२५/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१४/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.व्ही.व्ही.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.५८५/२०२६** **ने.ता.२०/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती विमल शंकररावजी धुर्वे, वय अं.७० वर्ष, धंदा-गृहीणी, रा.वार्ड क्र.२२, सावता चौक, वरुड, २) सौ.वंदना गोविंदराव परतेती, वय अं.४० वर्ष, धंदा- मजुरी, रा.सावता चौक, वरुड, ३) सौ.मीनाबाई रामकृष्ण परतेती, वय अं.३६ वर्ष, धंदा- मजुरी, रा.चिंचोली गवळी, ता.मोर्शी, ४) सौ.जयश्री किशोर टेकाम, वय अं.३० वर्ष, धंदा- मजुरी, रा.शिंगारखेड, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत शंकर केशवराव धुर्वे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२०/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०८/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**



## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठारकरे, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.६११/२०२६** **ने.ता.२४/०८/२०२६**

**अर्जदार :-** १) काशिनाथ संपतराव नागले, वय अं.७३ वर्ष, २) बाबाराव संपतराव नागले, वय अं.६६ वर्ष, ३) सौ.ललिता प्रदिप कुकडे, वय अं.५८ वर्ष, क्र.१ ते ३ रा.कुरळी, ४) सौ.चंद्रकला पांडुरंगजी मासोरे, वय अं.६८ वर्ष, रा.हिवरखेड, ५) सौ.शशिकला शेषरावजी गायकी, वय अं.६५ वर्ष, रा.वाठोडा, ६) श्रीमती वर्षा प्रल्हादराव नागले, वय अं.५२ वर्ष, ७) कुणाल प्रल्हादराव नागले, वय अं.२४ वर्ष, क्र.६ व ७ रा.कुरळी, ८) सौ.चंचल सुरज कुसरे, वय अं.२९ वर्ष, रा.गाडेगाव, ९) सौ.कोमल ताराचंद हरले, वय अं.२८ वर्ष, रा.मालखेड, १०) श्रीमती पंचफुलाबाई पुरुषोत्तम नागले, वय अं.५३ वर्ष, ११) सौ.प्रिती भुषण पवार, वय अं.३६ वर्ष, रा.नागसेन बुध्द विहार जवळ, मुलताई रोड, वरुड, १२) सौ.मिनल मंगेश कुकडे, वय अं.३३ वर्ष, रा.गाडेगांव, ता.वरुड

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत चिंधाबाई संपतराव नागले, रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०८/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **१७/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**




# ठाकरेंच्या मुंबईतील आंदोलनानंतर शिवाजी पार्क पोलिसांची मोठी कारवाई, ३ स्वतंत्र गुन्हे दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – पर्यावरणशास्त्रज्ञ सोनम वांगचुक यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मुंबईतील दादर परिसरात काल आयोजित करण्यात आलेल्या आंदोलना प्रकरणी आता पोलीस



प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. मुंबईतील शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात या आंदोलनाविरोधात तब्बल तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

'या' ३ कारणांमुळे दाखल झाले गुन्हे पहिला गुन्हा: विनापरवानगी आंदोलनाचे आयोजन केल्याप्रकरणी आयोजकांवर पहिला गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

दुसरा गुन्हा: आंदोलनाला पोलिसांची अधिकृत परवानगी नसतानाही लोकांना आणि कार्यकर्त्यांना मोठ्या संख्येने घटनास्थळी जमण्याचे आवाहन केल्याप्रकरणी दुसरा गुन्हा दाखल झाला आहे. तिसरा गुन्हा: मुख्य आंदोलनानंतरही दादर परिसरात ठिकठिकाणी विद्यार्थ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी आंदोलने केली. यामुळे दादरसारख्या गजबजलेल्या भागात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण झाली.या तिन्ही गुन्ह्यांमध्ये अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही, अशी माहिती मुंबई पोलिसांनी दिली आहे. 'हे दळभद्री सरकार आता बदललंच पाहिजे'; उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल दरम्यान, कालच्या आंदोलनात कार्यकर्त्यांना आणि विद्यार्थ्यांना संबोधित करताना ठाकरेंच्या शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केंद्र व राज्य सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

# क्षुल्लक कारणावरुन हाणामारी मोठी भेंमडीत भावंडांविरुध्द गुन्हा : १ जखमी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – क्षुल्लक कारणावरुन येथुन जवळच असलेल्या मोठी भेंमडी येथे दोन भावंडांनी एका युवकास मारुण गंभिररित्या जखमी केल्याची घटना घडली. या प्रकरणी वरुड पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरुन दोघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी ईश्वर उईके हा त्याचे घरासमोर उभा राहुन त्याचे पत्नीसोबत फोनवर बोलत असता तिथे आरोपी क्र.१ विशाल व क्र.२ कैलास तिथे आले व फिर्यादी ईश्वर यास म्हणाले की, 'फोनवर हळु बोल' असे म्हणुन शिवीगाळ करुन थापडांनी मारहाण केली व आरोपी क्र.२ कैलास याने लोखंडी सब्बलने मारुन जखमी केले, या मारहाणीत ईश्वर गंभिररित्या जखमी झाला. पुन्हा जोरात बोलला तर पाहुन घेण्याची धमकी दिली.

या प्रकरणी ईश्वर नारायण उईके (३५) रा.मोठी भेंमडी यांचे तक्रारीवरुन वरुड पोलिसांनी विशाल तुकाराम मरसकोल्हे (३५) व कैलास तुकाराम मरसकोल्हे (३०) दोन्ही रा.मोठी भेंमडी या भावंडांविरुध्द कलम ११८ (२), ३५१ (२), ३५२, ३ (५), भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.

## घरी कोणी नसल्याची संधी साधत

# महेश कॉलनीत घरफोडी : १ लाखांचा ऐवज लंपास

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – घरी कोणी नसल्याची संधी साधत अज्ञात चोरटयाने शहरातील महेश कॉलनी परिसरात घराचे कुलूप फोडून तब्बल १ लाख रुपयांचा मुददेमाल चोरुन नेल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी वरुड पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार, फिर्यादी संजय गावंडे यांचे जावई राजकुमार जयराम चढोकार (२३) हे काही दिवसापुर्वी



घराला कुलूप लावुन बाहेरगावी गेले होते. १६ जुलैच्या रात्रीच्या सुमारास यातील फिर्यादीचे जावई यांचे घराचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने कुलुप कोंडा तोडुन घरातील लाकडी कपाटातील रिंग अंगठी ४ ग्रॅम किंमत अंदाजे २० हजार रुपये, रिंग अंगठी वजन अंदाजे ४ ग्रॅम १५ मिली किंमत अंदाजे २० हजार रुपये, एक मिनी मंगळसुत्र वजन अंदाजे १२ ग्रॅम ३२२ मिली किंमत अंदाजे ६० हजार रुपये असा एकुण १ लाख रुपयांचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. यासंदर्भात फिर्यादी संजय केशवराव गावंडे (५१) रा.महेश कॉलनी, वरुड याचे तक्रारीवरुन अज्ञाताविरुध्द कलम ३०५, ३३१ (४) भा.न्या संहिता अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास सुरु आहे.

# घराचे कुलूप फोडून ७ लाखांचा ऐवज लंपास

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## शहरातील विजय नगर परिसरातील घटना



**वरुड** – शहरात चोरांनी पुन्हा एकदा उच्छाद मांडला असुन घरफोडीच्या या घटनेमुळे नागरिकांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. शहराच्या विजयनगर भागात ही धक्कादायक घटना समोर आली असून चोरांनी एका बंद घराचे कुलूप तोडून सुमारे ६ लाख ९८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल लंपास केला आहे.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादी दिनेश मुळे यांच्या पत्नी वैष्णवी या अमरावती येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल असल्यामुळे मुलगा पार्थसह सर्वच जण अमरावती येथे गेले होते त्यामुळे घर पूर्णपणे कुलूपबंद स्थितीत होते. घर बंद असल्याचे पाहून अज्ञात चोरांनी पाळत ठेवून चोरीची संधी साधली. दिनेश मुळे हे १० जुलै रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास अमरावतीवरुन परत वरुड येथील विजय नगर परिसरातील घरी आले असता घराच्या मुख्य दरवाजाचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत दिसले. त्यांनी घरात प्रवेश करुन पाहणी केली असता, बेडरुममधील कपाटाचे कुलूप तोडून आतील साहित्य अस्ताव्यस्त फेकलेले आढळले. कपाटातून चोरांनी सुमारे ६ लाख रुपये किंमतीचे ४३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, ८० हजार रुपये किंमतीची १०० ग्रॅम वजनाची चांदीची वाटी आणि १८ हजार रुपयांची रोख रक्कम असा एकूण ६ लाख ९८ हजार रुपयांचा मुद्देमाल पळवुन नेला. या प्रकरणी फिर्यादी दिनेश मुळे यांनी वरुड पोलीसात तक्रार दाखल केली आहे. दिनेश मुळे यांच्या तक्रारीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पो–लीस या घटनेचा पुढील तपास करत आहेत.

## टेकड्यांवरील स्फोट थांबेनात

# मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपानंतरही खारघरचा विध्वंस सुरूच

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – खारघरमधील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील टेकड्यांवर सुरू असलेला कथित दुहेरी विध्वंस अद्यापही थांबलेला नसल्याचा आरोप पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक रहिवाशांनी केला आहे. टाटा कर्करोग रुग्णालयाच्या मागील कथित बेकायदा दगडखाणीतील स्फोट, तसेच उत्सव चौकाजवळील रिअल इस्टेट प्रकल्पासाठी सुरू असलेले डोंगर फोडण्याचे काम सुरूच असल्याचे सांगण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात हस्तक्षेप करूनही प्रशासनाकडून अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याने



पर्यावरणवाद्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

या प्रकरणाची राष्ट्रीय हरित लवादाच्या (एनजीटी) पश्चिम विभागीय खंडपीठासमोर २१ जुलै रोजी अंतिम सुनावणी होणार आहे. त्यामुळे या सुनावणीपूर्वी खारघरच्या टेकड्यांवरील कथित उत्खनन आणि स्फोटांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी तसेच मुसळधार पावसात होणाऱ्या जोरदार स्फोटांमुळे परिसर हादरून जात असल्याच्या तक्रारी स्थानिक रहिवाशांनी केल्या आहेत. खारघरच्या टेकड्यांवर सुरू असलेल्या या 'दुहेरी हल्ल्याबाबत' चिंता व्यक्त करत नॅटकनेक्ट फाऊंडेशन, स्वर्णसृष्टी हॅबिटॅट रिस्टोरेशन फाऊंडेशन आणि सेव्ह खारघर इकॉलॉजी फोरम यांनी नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले होते.

# स्मार्ट मीटरविरोधात नागरिकांची मोहीम : शंभरहून अधिक लेखी तक्रारी दाखल

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** –स्मार्ट वीज मीटरबाबत जनजागृती करण्यासाठी रविवारी सकाळी राबवण्यात आलेल्या एका नागरी मोहिमेदरम्यान ग्राहकांकडून सुमारे १०० लेखी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. मीटर बसवण्याच्या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचा आरोप ग्राहकांनी केला. मुंबई महानगर क्षेत्रातील माटुंगा पूर्व, भायखळा, परळ गाव, विलेप–र्ले, सांताक्रुझ पूर्व, धारावी, वाशी, ठाणे आणि विरार पश्चिम अशा नऊ वेगवेगळ्या ठिकाणी ही मोहीम राबवण्यात आली. स्मार्ट मीटरबाबत रहिवाशांमध्ये जनजागृती करणे आणि ज्या ग्राहकांना वीज कंपन्यांकडून नोटिसा आल्या आहेत किंवा




ज्यांचे पारंपरिक वीज मीटर त्यांच्या संमतीशिवाय बदलून स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहेत, अशा ग्राहकांच्या तक्रारी गोळा करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. न्यायालयात दाद मागू! सामाजिक कार्यकर्ते कमलाकर शेणॉय यांच्या नेतृत्वाखाली चेतन त्रिवेदी, जी. आर. वोरा आणि प्रशांत गज्जर यांनी या मोहिमेचे आयोजन केले होते.




